रयत शिक्षण संस्थेचे,

सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर

# अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती नोटीस - २०२३-२०२४

**बी.कॉम./ एम.कॉम.मधील विद्यार्थ्यांसाठी ३१.१०.२०२३**

सन २०२३-२४ मधील सिनिअर महाविद्यालयातील अल्पसंख्यांक (मुस्लीम, ख्रिश्चन, शीख, बौध्द, पारसी, जैन) कॅटेगिरीतील विद्यार्थ्यांसाठी अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती **(Minority Scholarship)** अर्ज ऑनलाईन सुरु झालेले आहेत संबंधीत पात्र विद्यार्थ्यांनी **nsp.gov.in**/https://scholarships.gov.in/ या वेबसाईडवर शिष्यवृत्ती अर्ज ऑनलाईन भरुन सर्व कागदपत्र जोडून महाविद्यालयात दि. ०१/११/२०२३ ते दि. ३०/११/२०२३ अखेर सकाळी ११:०० ते दुपारी १:३० वाजेपर्यंत जमा करावे.

**अल्पसंख्यांक शिष्यवृत्तीचा अर्ज भरुन दिला तर सदर विद्यार्थ्यांना पेईंग फी प्रमाणे फी भरावी लागेल तसेच अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती अर्ज भरुन देणाऱ्या विद्यार्थ्यांना शासनाच्या इतर कोणत्याही फी सवलतीचा किंवा शिष्यवृत्ती / फ्रि-शिपचा अर्ज भरता येणार नाही याची संबंधीत विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**

**विद्यार्थ्यांनी ३०/११/२०२३ या अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवसाची वाट न पाहता लवकरात लवकर अर्ज ऑनलाईन भरुन महाविद्यालयात जमा करावा.**

अल्पसंख्यांक (मुस्लीम, ख्रिश्चन, शीख, बौध्द, पारसी, जैन) कॅटेगिरीतील विद्यार्थी जर **OBC, NT, EWS, SC,** या कॅटेगिरीत असतील व त्यांच्याकडे जातीच्या दाखल्यासह इतर सर्व कागदपत्र असतील तर अशा विद्यार्थ्यांना अल्पसंख्यांक किंवा त्यांच्या **OBC, NT, SC, EBC, EWS** या दोन्ही पैकी एकाच शिष्यवृत्तीचा अर्ज भरता येईल याची संबंधीत विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

**B.COM. व M.COM. मधील अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती अर्ज भरणारा विद्यार्थी जर विनाअनुदानित (नॉन ग्रँट ) तुकडीतील असेल तर अशा विद्यार्थ्यांनी त्यांनी प्रवेश घेतलेल्या फी सवलतीचाच अर्ज भरावा. अल्पसंख्यांक शिष्यवृत्तीचा अर्ज भरु नये किंवा अर्ज भरण्या अगोदर शिष्यवृत्ती विभागात चौकशी करावी.**

अल्पसंख्यांक शिष्यवृत्तीचे महाराष्ट्र राज्यासाठी ४७५७५ एवढे संच केंद्र शासनाने निर्धारित केलेले आहे. त्यामुळे अल्पसंख्यांक शिष्यवृत्तीचे अर्ज भरणाऱ्या सर्वच विद्यार्थ्यांना अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती मिळत नाही. याची अर्ज भरणाऱ्या संबंधीत विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

**अर्ज भरल्यानंतर खालीलप्रमाणे कागदपत्र अटेस्टेड किंवा सेल्फ अटेस्टेड करुन जोडावीत**

१ ऑनलाईन भरलेला अर्ज.

२ ऑनलाईन बोनाफाईड

३ अल्पसंख्यांकबाबतचे स्वत: प्रमाणित केलेले स्वयंघोषित प्रमाणपत्र व महाविद्यालय व्हेरिफिकेशन अर्ज.
( सदर अर्ज कॉलेज जवळील झेरॉक्समध्ये मिळतील )

४ शाळा सोडल्याचा दाखला झेरॉक्स

५ डोमासाईल सर्टिफिकेट / रहिवासी दाखला झेरॉक्स

६ रेशन कार्ड झेरॉक्स ७. आधार कार्ड झेरॉक्स

८ आधार कार्ड लिंक फॉर्म ९. सन २०२३-२४ मधील प्रवेश पावती झेरॉक्स

१० सन २०२२-२३ चा उत्पन्नाचा दाखला. वार्षिक उत्पन्न २.०० लाख रु.च्या आत.
**(ओरिजनल उत्पन्न दाखला तहसिलदार यांचेकडील )**

११ दहावी व त्या पुढील गुणपत्रक ( मागील परीक्षेत किमान ५० टक्के गुण आवश्यक ) झेरॉक्स

१२ बँक पासबुक झेरॉक्स

प्र. प्राचार्य,
सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर

सदर सूचना महाविद्यालयाच्या वेबसाईटवर देखील टाकण्यात आलेली आहे. **www.cdjcollege.com**

रयत शिक्षण संस्थेचे,

# सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स,श्रीरामपूर

## शिष्यवृत्ती नोटीस - २०२३-२४

## एकलव्य शिष्यवृत्ती योजना

**एम.कॉम.भाग-१ व २ मधील ओपन कॅटेगिरीतील ( EBC/ SEBC/ EWS / PAYING )**
**अनुदानित तुकडीतील विद्यार्थ्यांसाठी**

**३१.१०.२०२३**

सन २०२३-२४ मध्ये महाविद्यालयातील एम.कॉम.भाग-१ मधील अनुदानित तुकडीतील ज्या पात्र विद्यार्थ्यांना एकलव्य शिष्यवृत्तीचा अर्ज भरुन द्यावयाचा आहे अशा विद्यार्थ्यांनी अर्ज **mahadbtmahait.gov.in** या वेबसाईटवर ऑनलाईन भरुन महाविद्यालयात शिष्यवृत्ती विभागात दि.०१/११/२०२३ ते ३०/११/२०२३ अखेर सकाळी ११:०० ते दुपारी १:३० वाजेपर्यंत या दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणेच जमा करावेत.

मागील वर्षी एम.कॉम.भाग-१ मधील ज्या विद्यार्थ्यांना एकलव्य शिष्यवृत्ती मंजुर झालेली आहे अशा विद्यार्थ्यांनी पात्र असल्यास अर्ज नुतनीकरण करावा.

**सेंट्रल सेक्टर, अल्पसंख्यांक किंवा राजर्षी शाहू महाराज शिक्षण शुल्क योजना शिष्यवृत्तीचा अर्ज भरुन देणाऱ्या विद्यार्थ्यांना एकलव्य शिष्यवृत्ती योजनेचा अर्ज भरता येणार नाही याची संबंधीत विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**

**ऑनलाईन फॉर्म भरताना फक्त ओरीजनलच कागदपत्र अपलोड करावे. झेरॉक्स अपलोड करु नये.** झेरॉक्स अपलोड केले तर अशा विद्यार्थ्यांचे अर्ज दुरुस्तीसाठी विद्यार्थी लॉगीनला परत पाठविले जातील याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. तसेच ऑनलाईन अर्ज भरताना **SSC, XI** सह सर्व वर्गांची माहिती भरणे. **अर्ज भरताना फी पेड कॉलममध्ये फी झिरो (शुन्य ) टाकावी.**

| | |
|---|---|
| १ | डोमासाईल सर्टिफिकेट झेरॉक्स |
| २ | रेशन कार्ड झेरॉक्स |
| ३ | अल्प कुटुंबाबतचे प्रमाणपत्र / हमीपत्र हाताने भरुन जमा करणे |
| ४ | शाळा सोडल्याचा दाखला, इतर महाविद्यालयातून आलेले असल्यास टीसीची झेरॉक्स. ओरीजनल दाखल्याची पीडीएफ फाईल विद्यार्थ्याजवळ उपलब्ध नसल्यास **दाखल्याची झेरॉक्स महाविद्यालयातून अटेस्टेड करुन मगच अपलोड करावी.** |
| ५ | आधारकार्ड झेरॉक्स |
| ६ | आधार कार्ड बँक खात्याशी लिंक असलेला फॉर्म बँकेच्या सही शिक्क्यासह झेरॉक्स |
| ७ | प्रवेश पावती सन २०२३-२४ झेरॉक्स |
| ८ | **सन २०२२-२३ चा ओरिजनल उत्पन्नाचा तहसिलदार यांचेकडील दाखला जोडावा. उत्पन्न मर्यादा ७५०००/- हजार रुपयांपर्यंत.** (वडील मयत असल्यास वडीलांचा मृत्युचा दाखला जोडणे झेरॉक्स) |
| ९ | दहावी व त्यापुढील सर्व गुणपत्रक ( फेल व एटीकेटीसह सर्व गुणपत्रक जोडणे ) तसेच मागील वर्षाचा निकाल ऑनलाईन असल्यास **सदर निकाल कॉलेजमधून अटेस्टेड करुन मगच अपलोड करावा. बी.कॉमला ६० % टक्के गुण आवश्यक.** |
| १० | गॅप असल्यास गॅप सर्टिफीकेट - साध्या कागदावर (Affidavit) करणे झेरॉक्स. |
| ११ | बँक पासबुक झेरॉक्स |

सदर सूचना महाविद्यालयाच्या वेबसाईटवर देखील टाकण्यात आलेली आहे.
www.cdjcollege.com

प्र. प्राचार्य,
सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स,
श्रीरामपूर